December - 2021 (10)

5 रु. कोर्ट फी Rs.5 COURT FEE भारत INDIA पाँच रुपये FIVE RUPEES

5 रु. कोर्ट फी Rs.5 COURT FEE भारत INDIA पाँच रुपये FIVE RUPEES

## माहितीचा अधिकार अधिनियम ,२००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठीचा अर्ज

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 10 मा.अ.
दिनांक: 27/12/2021

**प्रती,**
**मा विधी विभाग,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**अर्जदाराचे संपूर्ण नाव : कमर अली नवाब मिर्झा**

**अर्जदाराचा पत्ता : सी/२०१, गोविंद नगर कॉम्प्लेक्स,**
**वोडाफोन गेलरी मागे,**
**मिरा रोड पूर्व, ठाणे ४०११०७**

**हव्या असलेल्या माहितीचा विषय / तपशील / माहितीचे वर्णन :**

केस क्रमांक **RCS/506/2020 सिने क्लासिक स्टुडीओची** आणि केस क्रमांक **RCS/601/2019 ग्रीन वेल्ली स्टुडीओची** सविस्तर ऑर्डर, सद्यस्थिती व कारवाई अहवाल सहित संपूर्ण माहिती मिळणेबाबत.

प्राप्त
दि.२८/१२/२१

**ज्या कालावधी संबंधात माहिती हवी असेल तो कालावधी :**
१ जानेवारी २०१९ ते आज पर्यंतची सविस्तर अहवाला सहित पूर्ण माहिती मिळणेबाबत.

**माहिती टपालाने हवी आहे की व्यक्तीशः हवी आहे :** स्वतः

**अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे किंव्हा कसे :** नाही

**ठिकाण : ठाणे**

**दिनांक : २७/१२/२०२१**

**संपर्क : ९६९९५५४६४३**

Jadhav
28/12/2021

कमर अली

**अर्जदाराची सही**

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./१०/२०२१-२२
दि. ०३/०१/२०२२

प्रति,

श्री. कमर अली नवाब मिर्झा
सी/२०१, गोविंद नगर कॉम्पलेक्स
वोडाफोन गॅलरीच्या मागे, मिरारोड पुर्व
जि. ठाणे ४०११०७

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**
**संदर्भ** :- आपला दि. २७/१२/२०२१ रोजीचा अर्ज.

महोदय,

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण दावा क्र. आर. सी. एस. ५०६/२०२० सिने क्लासिक स्टुडिओ व आर. सी. एस. ६०१/२०१९ ग्रीन वॅली स्टुडिओ बाबत दाखल दाव्यांमधील आदेश, सद्यस्थिती व कारवाई अहवाल याबाबतची संपुर्ण माहिती अपेक्षिली आहे. तरी आपणास खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देत आहे.

१) **दावा क्र. आर. सी. एस. ५०६/२०२० :-** मौजे काशी, सं. क्र. ३३ हि. क्र. ३/बी या जागेवरील गाळयाच्या बांधकामाबाबत वादी श्री. गुलाम घौस अब्दुल हमिद शेख यांनी मा. न्यायालय, ठाणे येथे सदरचा दावा दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे. सदर दाव्यात वादी यांनी निशाणी क्र. ८ अन्वये मिळणेकरीता दाखल केलेला Interim अर्ज मा. न्यायालयाने दि. ०४/१२/२०२० रोजी फेटाळला आहे. सदर आदेशाची प्रत उपलब्ध करुन देत आहे (एकुण ०२ प्रती)

२) **दावा क्र. आर. सी. एस. ६०१/२०१९ :-** मौजे काशी, सं. क्र. २६, २७, ३०/३, ५, ६, २५/८ या जागेवरील स्टुडिओच्या गाळयाच्या बांधकामाबाबत वादी मे. ग्रीन व्हॅली स्टुडिओ यांनी मा. न्यायालय, ठाणे येथे सदरचा दावा दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे. सदर दाव्यात वादी यांनी तात्पुर्ता मनाई हुकुम मिळणेकरीता केलेला अर्ज मा. न्यायालयाने दि. २३/९/२०२१ रोजी मान्य केला आहे. सदर आदेशाची प्रत उपलब्ध करुन देत आहे (एकुण ०५ प्रती)

सदरच्या एकुण ०७ प्रतींकरीता रु. ०२/- प्रमाणे रु. १४/- चा विधी विभागाकडे भरणा करुन सदरची माहिती प्राप्त करुन घेता येईल.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास मारुती गायकवाड, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

RTI Application Reply




To,

Shri. Kamar Ali Nawab Mirza
C/201, Govind Nagar Complex
Vodafone Gallery, Mira Road (E)
Thane - 401107